# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

क्र.संगाबाअवि/1/109/2-345/2020 दि. 30.3.2020

प्रति,

1) सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुख,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

2) प्राचार्य,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी
संलग्नित सर्व महाविद्यालये.

**विषय** -कोरोना विषाणू (कोविड-19) या संसर्गजन्य जागतिक आपत्तीकरिता माहे मार्च-2020 च्या वेतनातून एक दिवसाचे वेतन कपात करून मा. मुख्यमंत्री सहायता निधी कोषात जमा करणेबाबत आवाहन.

संदर्भ - 1) मा.अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे आवाहन पत्र दि. 28 मार्च, 2020.
2) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचारी संघ यांचे पत्र क्र.संगाबाअवि/शिकसं /26 /2020 दि.30.3.2020.

आपणास विदितच आहे की, कोरोना विषाणु (कोव्हीड-19) या संसर्गजन्य आजारामुळे देशातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. या संसर्गजन्य विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व या जागतिक आपत्तीचा सामना करण्यासाठी देशाचे मा.पंतप्रधान तसेच राज्याचे मा. मुख्यमंत्री दिवसरात्र प्रयत्न करीत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून देशात प्रदीर्घ लॉकडाऊन केल्यामुळे देशाचे आर्थिक नियोजन ढासळलेले आहे. या आपत्तीचा सामना करताना डॉक्टर्स, नर्सेस, पोलीस, प्रशासन, स्वच्छता कर्मचारी, यांनी जीवाची बाजी लावलेली आहे. या सर्वांचे प्रयत्न आपल्या व आपल्या कुटुंबांसाठी आहेत. याप्रसंगी आपणही या देशाचे नागरीक म्हणून यासर्व लोकांसोबत उभे राहणे व आपले योगदान देणे आपले कर्तव्य आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील सर्व वैधानिक अधिकारी व शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी, यांनी आपल्या माहे मार्च २०२० च्या वेतनातून एक दिवसाचे वेतन कपात करून मा. मुख्यमंत्री सहायता निधी कोषात जमा करण्यास सहमती दिली आहे. सध्या लॉकडाऊन मुळे विद्यापीठ तसेच महाविद्यालये बंद असल्यामुळे व अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर

कर्मचाऱ्यांना घरूनच कामे करण्याचे आदेश असल्यामुळे १०० टक्के कर्मचाऱ्यांची लेखी सहमती प्राप्त होणे अडचणीचे आहे. त्यामुळे विद्यापीठातील सर्व वैधानिक अधिकारी व शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी कर्मचाऱ्यांची सहमती अपेक्षून त्यांच्या माहे मार्च २०२० च्या वेतनातून एक दिवसाचे वेतन कपात करून मा.मुख्यमंत्री सहायता निधी कोषात जमा करण्यात येईल.

विद्यापीठ अनुदान आयोगाचे मा. अध्यक्ष यांनी एक दिवसाचे वेतन कपात बाबत केलेले आवाहन विचारात घेऊन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे मा. कुलगुरु यांचे वतीने याद्वारे आवाहन करण्यात येते की विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य यांनी आपल्या अधिनस्थ शिक्षक यांना मा. अध्यक्षांचे उपरोक्त आवाहन आपल्या अधिनस्थ अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे तसेच शिक्षकांना विश्वासात घेऊन त्यांच्या स्वेच्छेने माहे मार्च २०२० च्या वेतनातून एक दिवसाचे वेतन कपात करून मा.मुख्यमंत्री सहायता निधी कोषात जमा करण्याची परवानगी घ्यावी.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख व शिक्षक इमेल द्वारे वित्त व लेखा अधिकारी किंवा कुलसचिव यांना एक दिवसाचे वेतन कपातीबाबत कळवू शकतात त्याप्रमाणे वेतन कपातीची व मा. मुख्यमंत्री सहायता निधी कोषात जमा करण्याची कार्यवाही केली जाईल आणि महाविद्यालयांचे प्राचार्य यांनी त्यांचे स्तरावर वेतन कपातीची व मा.मुख्यमंत्री सहायता निधी कोषात जमा करण्याची कार्यवाही करावी.

- मा.कुलगुरूंचे निर्देशानुसार.

कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

प्रत माहितीकरिता -

1) मा.अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली.

2) अध्यक्ष, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचारी संघ, अमरावती

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

प्रो. धीरेन्द्र पाल सिंह
अध्यक्ष
Prof. D. P. Singh
Chairman

विश्वविद्यालय अनुदान आयोग
**University Grants Commission**
(मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार)
(Ministry of Human Resource Development, Govt. of India)
बहादुरशाह ज़फ़र मार्ग, नई दिल्ली-110002
Bahadur Shah Zafar Marg, New Delhi-110002
दूरभाष Phone : कार्यालय Off. : 011-23234019, 23236350
फैक्स Fax : 011-23239659, e-mail : cm.ugc@nic.in | web: www.ugc.ac.in

28th March, 2020

**APPEAL: For Contribution to Combat COVID-19**

Dear Colleagues,

Our country and the world as a whole are passing through unprecedented times due to COVID-19 pandemic. The number of persons infected with Corona virus are increasing day by day. We, the educational fraternity, have a great responsibility of not only making the people aware of preventive and precautionary measures to safeguard themselves and check the further spread of this virus, but also come forward to contribute financially to strengthen the efforts of the Government to combat the COVID-19 pandemic.

We, at UGC, have decided to make a humble contribution of One Day Salary to the Prime Minister's National Relief Fund. I appeal to the Vice Chancellors of the Universities and Directors/Principals of Institutes/Colleges to urge the teaching and non-teaching colleagues of their institutions to come forward and contribute for this noble cause. I am sure that this humble contribution of the educational fraternity will go a long way in serving the humanity in present moments of crisis.

Let us stand together for the well-being of our countrymen and the mankind as a whole during this challenging time.

Best wishes,

DPSingh


Prof. D. P. Singh
Chairman

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ शिक्षकेत्तर कर्मचारी संघ

(नोंदणी क्र. एन.जी.पी. ३०२५)

# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY NON TEACHING EMPLOYEE'S UNION

(Regd.No.NGP-3025)



○ अध्यक्ष ○
श्री. अजय देशमुख
8551088774

○ महासचिव ○
श्री. विलास सातपुते
9822474104

○ उपाध्यक्ष
श्री. संजय ढाकुलकर
9422888262
श्री. शाम चहाकार
8975852132

○ सहसचिव
श्री. संजय बाळापुरे
9527360925
श्री. नरेंद्र खैरे
9552754979

○ कोषाध्यक्ष
श्री. विजय तुपट
9923793255

○ सदस्य
श्री. प्रेम मंडपे
8975852115
श्री. प्रफुल्ल ठाकरे
9823684731
श्री. संतोष मालपुरे
9421741203
श्री. सतिश लोखंडे
8975852303
श्री. रामभाऊ बुगल
8975852214
श्री. शशिभुषण हुसे
9423722927

○ मानसेवी सदस्य
श्री. मनिष शास्त्री
9422831810
श्री. निलेश वंदे
9545522232
श्री. मुरलीधर चिलुरकार
9420520061

○ कार्याध्यक्ष, महासंघ
श्री. अजय देशमुख

○ [illegible]
श्री. दिलीप पाटील
9403171227

जावक क्र.संगाबाअविशिकसं/२६/२०२०
दिनांक ३०/३/२०२०

प्रति,

मा.कुलगुरु,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

विषय:- कोव्हीड-१९ या संसर्गजन्य जागतीक आपत्तीकरिता शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनातून एक दिवसाचे वेतन कपात करुन मा.मुख्यमंत्री सहायता निधी कोषात जमा करण्याबाबत.

मा. महोदय,

कोव्हीड-१९ या संसर्गजन्य आजारामुळे देशातील जनजीवन ठप्प झालेले आहे. या परीस्थितीचा सामना करण्याकरिता मा.पंतप्रधान व राज्याचे मा.मुख्यमंत्री,आरोग्यमंत्री दिवसरात्र प्रयत्न करीत आहे. प्रदीर्घ लॉकडाऊनमुळे देशाचे आर्थीक नियोजन ढासळलेले आहे. या आव्हानाचा सामना करतांना डॉक्टर,नर्स,पोलीस, प्रशासन,स्वच्छता कर्मचारी यांनी जीवाची बाजी लावलेली आहे. यासर्वांचे प्रयत्न आपल्या व आपल्या कुटुंबाच्या आणि पिडीत रुग्ण व त्यांच्या कुटुंबासाठी आहेत. याप्रसंगी आपणही या देशाचे नागरीक म्हणुन यासर्व लोकांसोबत उभे राहीले पाहीजे हे आपले कर्तव्य आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेने सामाजिक दायित्वाची भावना नेहमीच जपलेली आहे. आपणास विनंती करण्यात येते की, सर्व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकडून माहे मार्च-२० चे वेतनामधून एक दिवसाचे वेतन कपात करुन मा.मुख्यमंत्री सहायता निधी कोषात जमा करण्याची सहमती देण्यात येत आहे. आपण तसे आदेश मा.कुलसचिव व मा.वित्त व लेखा अधिकारी यांना उचित कार्यवाहीस्तव द्यावेत, ही विनंती.

आपले

| | |
|---|---|
| (अजय देशमुख) | (विलास सातपुते) |
| **अध्यक्ष** | **महासचिव** |

संत गाडगे बाबा अमरावती शिक्षकेत्तर कर्मचारी संघ

प्रतिलिपी :- मा.कुलसचिव,सं.गा.बा.अ.वि.यांना माहिती तथा योग्य

" कर्मचारी भवन", विद्यापीठ परीसर,अमरावती. फोन नं. 0721-2662206 / 07 / 08 | E-mail : sgbaunteunion